महाराष्ट्र शासन

सह संचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग

17, डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे-४११००१

Website: www.jdhepune.in E-mail: jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक 020 - 26127833, 020-26051632 फॅक्स क्रमांक 020- 26051632

क्र. न्यायाप्र-२०२५/(१५५०३७७/२५)/पुणे विभाग दि.०२ सप्टेंबर, २०२६

प्रति,

१) सचिव, इंडीयन लॉ सोसायटी, पुणे ४११००४. (indianlawsociety@ilslaw.in)

२) प्राचार्य, आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे ४११००४. (ilslaw@ilslaw.in)

३) श्री.मयुर सुहास गरुड (mayurgarud999@gmail.com)

विषय :- रिट याचिका क्र. ६३५७/२०२६

इंडियन लॉ सोसायटी, पुणे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमाक-:E. No.: १६५५६२८/२०२४-MHT-(HE-५)

दि. ०२ सप्टेंबर, २०२६.

२) मा. संचालनालयाकडील क्र. क्र. अशाम/२०२६/ILS/या.क्र.६३५७-२०२६/पुवि/ई-२२८४११२/मवि-२, दि. ०२ सप्टेंबर, २०२६.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन शासन / संचालनालयाच्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी शासन पत्र दि. १३ एप्रिल, २०२६ तसेच, त्यास अनुसरुन असलेले संचालनालयाकडील व प्रस्तूत कार्यालयाकडील पत्र दि. १५.४.२०२६ च्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ६३५७/२०२६ दाखल केली.

सदर याचिकेच्या अनुषंगाने सुनावणी पार पडली असुन मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०७ मे, २०२६ रोजीच्या आदेशात नमूद केल्यानुसार सदर न्यायालयीन प्रकरणी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या समक्ष दि. २८ जुलै, २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

उपरोक्त सुनावणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांनी दि.०२.०९.२०२६ रोजी सुनावणी आदेश पारित केले आहेत. सदरहू सुनावणी आदेश संदर्भाधिन शासन पत्र व मा.संचालनालयाकडील दि. ०२ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तूत कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

सदर आदेशाच्या प्रती माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 02-09-2026
22:04:38

**(डॉ.अशोक उबाळे)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

प्रत:-

१. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ०१६ यांना माहितीसाठी सविनय सादर.
3. मा.शासकीय विधीज्ञ, उच्च न्यायालय, मुंबई, सरकारी वकीलांचे कार्यालय, रिट सेल (अपिलेट साईड), मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

Web:www.dhepune.gov.in ☎ ०२०/२६१२२११९ : director.dhepune@nic.in


क्र. अशाम/२०२६/ILS/या.क्र.६३५७-२०२६/पुवि/ई-२२८४११२/मवि-२ दि. २ सप्टेंबर २०२६

प्रति,

विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण, पुणे.

विषय:- रिट याचिका क्र. ६३५७/२०२६ इंडियन लॉ सोसायटी, पुणे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक-:E. No.: १६५५६२८/२०२४-MHT-(HE-५), दि. २ सप्टेंबर, २०२६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन शासन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी शासन पत्र दि. १३ एप्रिल, २०२६ तसेच, त्यास अनुसरुन असलेले संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र दि. १५.०४.२०२६ च्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ६३५७/२०२६ दाखल केली.

सदर याचिकेच्या अनुषंगाने सुनावणी पार पडली असुन मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०७ मे, २०२६ रोजीच्या आदेशात नमूद केल्यानुसार सदर न्यायालयीन प्रकरणी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या समक्ष दि. २८ जुलै, २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

उपरोक्त सुनावणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांनी दि.०२.०९.२०२६ रोजी सुनावणी आदेश पारित केले आहेत. सदरहू सुनावणी आदेश संदर्भाधिन शासन पत्र दि. २ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयास प्राप्त झालेली आहे. (प्रत संलग्न.)

सदर आदेशाच्या प्रती आपल्या स्तरावरुन सचिव / प्राचार्य इंडियन लॉ सोसायटी, पुणे आणि श्री. मयुर गरुड यांना पाठविण्यात याव्यात.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)

प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, पुणे १६

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक414-,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई032 400-.

**दूरध्वनी क्र 022-2279317 Email ID : mashi5-hted@mah.gov.in**

---

क्रमांक-:E. No.: 1655628/2024-MHT-(HE-5) दि. 2 सप्टेंबर, 2026

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण, पुणे.

विषय:- रिट याचिका क्र.6357/2026 इंडियन लॉ सोसायटी, पुणे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.

इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी शासन पत्र दि. 13 एप्रिल, 2026 तसेच, त्यास अनुसरुन असलेले संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र दि. 15.04.2026 च्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. 6357/2026 दाखल केली. सदर याचिकेच्या अनुषंगाने सुनावणी पार पडली असुन मा. उच्च न्यायालयाच्या दि. 07 मे, 2026 रोजीच्या आदेशात नमूद केल्यानुसार सदर न्यायालयीन प्रकरणी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या समक्ष दि. 28 जुलै, 2026 रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. उपरोक्त सुनावणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांनी दि.02.09.2026 रोजी सुनावणी आदेश पारित केले आहेत. सुनावणी आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. सदर आदेशाच्या प्रती आपल्या स्तरावरुन सचिव / प्राचार्य इंडियन लॉ सोसायटी, पुणे आणि श्री. मयुर गरुड यांना पाठविण्यात याव्यात.

Digitally signed by
Nitin Shankar Kshirsagar
Date: 02-09-2026
19:58:52

**(नि. श. क्षिरसागर)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

1. सचिव / प्राचार्य इंडियन लॉ सोसायटी, पुणे
2. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे
3. सहाय्यक सरकारी अभियोक्ता, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

नस्ती क्रमांक.E.No.:१६५५६२८/२०२६-MHT-(HE-५)

**इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र. ६३५७/२०२६ प्रकरणी दि. ०७ मे, २०२६ रोजीच्या सुनावणी नंतर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशात नमुद केल्यानुसार मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्याकडे दि. २८ जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीचे आदेश.**

**इंडियन लॉ सोसायटी, पुणे व आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे - वादी**

**विरुद्ध**

**संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - प्रतिवादी**

इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी शासन पत्र दि. १३ एप्रिल, २०२६ तसेच, त्यास अनुसरुन असलेले संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र दि. १५.०४.२०२६ च्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ६३५७/२०२६ दाखल केली. शासन पत्र दि. ०७ मे, २०२६ अन्वये सहायक सरकारी अभियोक्ता यांना कळविल्यानुसार, सदर याचिकेमधील दि. ०७ मे, २०२६ रोजीच्या सुनावणी दरम्यान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी इंडियन लॉ सोसायटीच्या आय.एल.एस. विधी महाविद्यालय यांना पाठवलेली दि. १३ एप्रिल, २०२६ व दि. १५ एप्रिल, २०२६ रोजीची पत्रे शासन मागे घेत असून याबाबत याचिकाकर्ते आणि संबंधितास चौकशी समितीच्या अहवालाची प्रत पुरवून त्यांचे म्हणणे ऐकून नव्याने आदेश पारीत करण्यात येतील, असे विधान केले. त्यास अनुसरून मा. उच्च न्यायालयाने दि. ०७ मे, २०२६ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका निकाली काढली.

२. मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०७ मे, २०२६ रोजीच्या आदेशानुसार सदर न्यायालयीन प्रकरणी माझ्या समोर प्रथम दि. २२.०६.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान सचिव, इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी दिलेल्या लेखी निवेदनानुसार पुढील सुनावणी दि. २८ जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीस खालील अधिकारी/तक्रारदार व इतर संबंधित व्यक्ती उपस्थित होते.

१) उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य,

C. B. Patil (चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

२) संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे,

३) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

४) सचिव, इंडियन लॉ सोसायटी, पुणे व प्रतिनिधी

५) श्री. मयूर गरूड, तक्रारदार

३. सदर सुनावणी दरम्यान कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सचिव, इंडियन लॉ सोसायटी, पुणे व प्रतिनिधी यांचे तसेच, तक्रारदार श्री. मयूर गरूड यांची बाजू ऐकून घेण्यात आली. त्याच बरोबर सदर सुनावणीच्या अनुषंगाने दि. २८.०७.२०२६ रोजी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, इंडियन लॉ सोसायटी, पुणे व श्री. मयुर गरूड यांनी स्वतंत्र निवेदने सादर केली.

**४. सदर प्रकरणाचा वस्तुस्थितीदर्शक तपशील खालीलप्रमाणे आहे :-**

अ) श्री. मयुर सुहास गरूड यांनी इंडीयन लॉ सोसायटीच्या लॉ महाविद्यालयाने अतिरीक्त शुल्क आकारणी केल्याविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ दाखल केली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दि. १२.०२.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार याचिकाकर्ता यांच्या दि. ११.०४.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जावर रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ मधील मागणीतील मुद्दा क्र. (g) च्या अनुषंगाने शासनाने दोन महिन्यात निर्णय घ्यावयाचा होता. रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ मधील मुद्दा क्र. (g) खालीलप्रमाणे आहे.

> g. Be pleased to direct the Respondent No. 4 to take appropriate action against the Respondent College Management for refund of Rs. 104863 /- illegally collected from the Petitioner in academic years of 2020-21, 2021-22 and 2024-25 with due interest.

ब) मा. न्यायालयाच्या दि. १२.०२.२०२६ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता उच्च शिक्षण संचालनालयाने दि. १० मार्च, २०२६ रोजीच्या आदेशान्वये डॉ. अर्चना बोऱ्हाडे, सहसंचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत केली होती. सदर समितीने दि. ३० मार्च, २०२६ रोजी अहवाल उच्च शिक्षण संचालनालयास सादर केला. सदरचा अहवाल उच्च शिक्षण संचालनालयाने दि. ३० मार्च, २०२६ रोजी शासनास सादर केला आहे.

क) सदर प्रकरणी चौकशी समितीने सादर केलेला अहवाल आणि त्यातील निष्कर्ष विचारात घेऊन, शासन पत्र दि. १३ एप्रिल, २०२६ अन्वये इंडीयन लॉ सोसायटीच्या विधी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ या वर्षातील इतर शुल्क म्हणुन बेकायदेशीरपणे व अपारदर्शक पध्दतीने आकारलेली रक्कम रु. ०१,०४,८६३/- याचिकाकर्ते श्री. मयुर गरुड यांस फी भरलेल्या पावतीच्या दिनांकापासून महाविद्यालय विद्यार्थ्यास परतफेड करेल त्या दिवसापर्यंत ६ टक्के दराने व्याज

C.B.Patil (चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

महाविद्यालयाकडून दिले जाईल याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संचालनालयास कळविले होते. शासन पत्रास अनुसरुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने दि. १५ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांना कळविले होते. त्यानुसार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांनी दि. १५ एप्रिल, २०२६ च्या पत्रान्वये सचिव, इंडियन लॉ सोसायटी, पुणे व प्राचार्य, आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे यांना कळविले होते.

५. इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी शासन पत्र दि. १३ एप्रिल, २०२६ व संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे दि. १५.०४.२०२६ रोजीच्या पत्राविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ६३५७/२०२६ दाखल केली. सदर रिट याचिकेत दि. ०७.०५.२०२६ रोजीच्या सुनावणी दरम्यान शासन निर्देशानुसार सहाय्यक शासकीय अभियोक्ता यांनी केलेले निवेदन मा. उच्च न्यायालयाने स्विकारले. त्यानुसार सदर न्यायालयीन प्रकरणी माझ्या समोर दि. २८.०७.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

**६. श्री. मयुर सुहास गरुड यांनी दि. २८.०७.२०२६ च्या निवेदनात नमुद केलेल्या बाबींपैकी ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

६.१. आय.एल.एस. लॉ कॉलेज, पुणे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमावलीत (परिपत्रक क्र. PGS/७८५२, PGS/५४२ व PGS/६७६) नमूद नसलेल्या १७ अतिरिक्त शिर्षकांखाली (उदा. Moot Court, E-Learning, Legal Aid इ.) प्रति विद्यार्थी एकूण ३६,७९०/- रुपये बेकायदेशीरपणे वसूल केले आहेत. महाविद्यालयाने केलेली सदरची कार्यवाही कॅपिटेशन फी प्रतिबंधक कायदा, १९८७ चा भंग करणारी आहे.

६.२. महाविद्यालयाने २०१९-२० ते २०२३-२४ या काळात या १७ बेकायदेशीर शिर्षकांखाली २९.६४ कोटी रुपये वसूल केले, तर प्रत्यक्ष खर्च केवळ ४.०९ कोटी रुपये केला. उर्वरित रक्कम स्वत:कडे ठेवून सुमारे ६२४.४३ % नफा कमावला आहे.

६.३. विद्यापीठाच्या चौकशी समितीने (अहवाल दि. ०९.०८.२०२५) सदर शुल्क वसुली बेकायदेशीर ठरवून महाविद्यालयावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केली आहे. तसेच, शुल्क निर्धारण समितीने (दि. १०.०७.२०२६) महाविद्यालयाचा सुधारित शुल्काचा प्रस्ताव फेटाळून अत्यंत कमी शुल्क मंजूर केले आहे.

६.४. 'टी.एम.ए. पै' व 'पी.ए. इनामदार' खटल्यांतील सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यानुसार, आधी शुल्क वसूल करून नंतर त्यास मान्यता घेणे (Post-audit) हे असंवैधानिक असून शिक्षणाचे व्यापारीकरण करणारे आहे.

C. B. Patil

(चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य

६.५. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ लागू झाल्यानंतर जुनेच नियम लागू राहतात (कलम १४७). त्यामुळे कोणत्याही शासनमान्यतेशिवाय संस्था स्वेच्छेने किंवा अनियंत्रितपणे नवीन फी आकारू शकत नाही.

६.६. तक्रारदाराकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ मध्ये वसूल केलेली १,०४,८६३/- रुपयांची बेकायदेशीर फी व्याजासह परत करण्यात यावी. महाविद्यालय फी परत करत नसल्यास, ही रक्कम शासनाकडून महाविद्यालयाला मिळणाऱ्या अनुदानातून कपात करून तक्रारदारास दिली जावी. बेकायदेशीर फी वसुलीबद्दल महाविद्यालयावर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी प्रतिबंधक) कायदा, १९८७ अंतर्गत कारवाई करण्यात यावी. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व पुराव्यांचा विचार करून स्पष्ट अंतिम आदेश (Reasoned Order) पारित करावेत.

**७. इंडियन लॉ सोसायटी यांनी दि. २८.०७.२०२६ रोजीच्या सुनावणी दरम्यान सादर केलेल्या दि. २८.०७.२०२६ रोजीच्या निवेदनात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले आहेत.**

७.१. शासन किंवा गठीत चौकशी समितीला महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ (७) व (८) अन्वये शुल्क परताव्याचा (रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ मधील मागणी मुद्दा क्र. 'g' नुसार) आदेश देण्याचा अधिकार नाही.

७.२. कोविड-१९ मुळे विद्यापीठाने दि. २८.०२.२०२० च्या आदेशास दि. २७.०६.२०२० व दि. २५.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती दिलेली असल्याने, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये पूर्वीचे शुल्क दर रु. ३६,७९०/- लागु राहतील.

७.३. इतर शुल्काबाबत शुल्क निर्धारण समितीसमोर दि. २३.०३.२०२३ व २६.०२.२०२४ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला असुन सदरचे प्रस्ताव प्रलंबित असल्याने विद्यापीठाच्या दि. ०८.०६.२०२३ च्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये जुने शुल्क सुरु ठेवण्यास मान्यता दिली असल्याने शुल्क आकारणे सुरु ठेवले होते. विहित मुदतीत निर्णय न झाल्याने देखीव मान्यतेनुसार (Deemed Approval) प्रस्ताव आपोआप मंजूर मानला गेला.

७.४. शासनाचे दि. १३.०४.२०२६ रोजीचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दि. ०७.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये रद्द ठरवले आहेत.

७.५. मा. न्यायालयाच्या दि. १२.०२.२०२६ रोजीच्या आदेशास अनुसरुन शासनाने गठित केलेल्या चौकशी समितीमध्ये व विद्यापीठाच्या कुलगुरुंनी ऑगस्ट २०२५ मध्ये स्थापन केलेल्या चार सदस्यीय समितीमध्येही विद्यापीठाचे उपकुलसचिव असल्याने समिती पक्षपाती होती.

C. B. Patil (चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

७.६. विद्यापीठाने दि. ३०.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ मधील प्रलंबित असलेल्या इतर शुल्काबाबतच्या प्रस्तावांच्या आधारे २०२६-२७ साठी आकारण्यात येणारे इतर शुल्क निश्चित केले होते. त्याविरोधात रिट याचिका क्र. ७६७२/२०२६ दाखल करण्यात आली असता मा. उच्च न्यायालयाने दि. २९.०६.२०२६ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये विद्यापीठाच्या दि. ३०.०४.२०२६ रोजीच्या आदेशास स्थगिती देऊन प्रलंबित प्रस्तावांवर म्हणणे ऐकून त्यावर दोन आठवडयात निर्णय घेणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार विद्यापीठ शुल्क समितीने दि. १०.०७.२०२६ रोजीच्या आदेशान्वये चुकीच्या पध्दतीने सुधारित दर २७१४ /-, ४०३१ /- व ३३४२ /- निश्चित केले आहेत. सदर आदेशाला मा. उच्च न्यायालयात आव्हान करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

७.७. श्री. मयुर गरुड यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ मधील मागणी क्र. (g) अमान्य करुन न्यायोचित आदेश निर्गमित करावेत.

**८. इंडियन लॉ सोसायटी, पुणे यांनी दि. २८.०७.२०२६ रोजीच्या सुनावणी दरम्यान दिलेल्या निवेदनातील बाबी विचारत घेता, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी दि. २८.०७.२०२६ रोजी सादर केलेल्या अहवालातील तपशील खालीलप्रमाणे आहे.:**

८.१. मा. उच्च न्यायालयाच्या दि. १२.०२.२०२६ रोजीच्या आदेशात नमुद केल्यानुसार शासन पत्र दि. १० मार्च, २०२६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत आणि त्याबाबतचा यथोचित प्रस्ताव शासनास/संचालनालयास सादर करण्याकरिता डॉ. अर्चना बोऱ्हाडे, सहसंचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदर समितीने दाखल केलेल्या दि. ३०.०३.२०२६ रोजीच्या अहवालानुसार शासन पत्र दि. १३.०४.२०२६ हे कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुनच निर्गमित केले आहे.

८.२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि. ०१.०३.२०१७ पासून राज्यात लागु करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम १०१ (७) प्रमाणे आय. एल. एस. विधी महाविद्यालयाने विद्यापीठाने ठरवुन दिलेल्या शिर्षाव्यतिरिक्त इतर शिर्षाखाली शुल्क निश्चित करुन घेण्याचा प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक असताना सदर महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वा २०२१-२२ मध्ये विद्यापीठाची मान्यता न घेता श्री. मयुर गरुड व इतर विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर व अपारदर्शक पध्दतीने शुल्क वसुल केले आहे.

८.३. इंडियन लॉ सोसायटी या संस्थेने दि. २३.०३.२०२३ रोजी इतर शुल्काचा प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास प्रथम सादर केला. विद्यापीठाच्या दि .०८.०६.२०२३ रोजीच्या पत्राचा चुकीचा अर्थ लावून संबंधित संस्थेमार्फत २०२४-२५ मध्येही बेकायदेशीर व अपारदर्शक पद्धतीने शुल्क वसूल केले गेले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ मध्ये मानीव मान्यता (Deemed Approval) कोणतीही तरतूद नाही.

C.B.Patil

(चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

८.४. इंडियन लॉ सोसायटी यांनी दाखल केलेल्या याचिका क्र. ७६७२/२०२६ मधील दि. ०७.०५.२०२६ रोजीच्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ मधील दि. १२.०२.२०२६ रोजीचे आदेश रद्द केलेले नाहीत, तर शासन पत्र दि. ०७.०५.२०२६ मधील मान्यतेनुसार सहायक शासकीय अभियोक्ता यांनी इंडियन लॉ सोसायटीच्या आय.एल.एस. विधी महाविद्यालय यांना पाठवलेली दि. १३ एप्रिल, २०२६ व दि. १५ एप्रिल, २०२६ ची पत्रे शासन मागे घेत असून याबाबत याचिकाकर्ते आणि संबंधितास चौकशी समितीच्या अहवालाची प्रत पुरवून त्यांचे म्हणणे ऐकून नव्याने आदेश पारीत करण्यात येतील, असे विधान केले होते. त्यानुसार मा. न्यायालयाने दि. ०७.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये नैसर्गिक न्याय तत्त्वाचा अवलंब करण्यासाठी जुने पत्र मागे घेऊन नव्याने सुनावणी देण्यास मान्यता दिली होती.

८.५. शासनाने डॉ. अर्चना बोऱ्हाडे, सहसंचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत ३ सदस्यीय चौकशी समितीने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करून, दोन्ही बाजूंचे म्हणणे व कागदपत्रे विचारात घेऊन दि. ३०.०३.२०२६ रोजीच्या अहवालानुसार निर्णय घेतला आहे. त्यामुळे केवळ दोन समित्यांमध्ये एकच सदस्य असल्याने समितीची कार्यवाही पक्षपाती होत असल्याचा आरोप पुर्णत: चुकीचा आणि निराधार आहे.

८.६. विद्यापीठाने दि. ३०.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये इंडीयन लॉ सोसायटीच्या विधी महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आकारण्यात येणारे इतर शुल्क निश्चित केले होते. त्याविरोधात संस्थेने रिट याचिका क्र. ७६७२/२०२६ दाखल केली असून, मा. उच्च न्यायालयाने दि. २९.०६.२०२६ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये विद्यापीठाच्या दि. ३०.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये महाविद्यालयाच्या प्रलंबित प्रस्तावांवर त्यांचे म्हणणे ऐकून त्यावर दोन आठवडयात निर्णय घेणेबाबत निर्देश दिले आहेत. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यापीठाच्या शुल्क निश्चिती समितीने, महाविद्यालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे वाढीव शुल्क मंजुर न केल्यास अतिरिक्त शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे लागेल, असे मा. उच्च न्यायालयाने सदर आदेशात नमुद केले आहे. त्यानुसार आय. एल. एस. विधी महाविद्यालयाने दि. २६.०२.२०२४ रोजी शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ साठी इतर शुल्कासंदर्भात सादर केलेल्या प्रस्तावावर शुल्कनिश्चिती समितीने कायद्यातील तरतुदींनुसार विहीत मुदतीत निर्णय घेऊन सदरचा निर्णय दि. १०.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित महाविद्यालयास कळविण्यात आला आहे. त्यामुळे महाविद्यालयाने विद्यापीठाने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा जास्त वसूल केलेली रक्कम परत करणे बंधनकारक आहे.

**९. सदर प्रकरणी नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीची निरीक्षणे आणि निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:-**

९.१. आय.एल.एस. संस्थेच्या सचिवांनी त्यांच्या लेखी निवेदनात विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र.पीजीएस/ ७८५२, दि.२३.१२.२००९ मधील General Conditions क्र.४ प्रमाणे प्राप्त अधिकारात विद्यापीठाने

C.B.Patil (चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

ठरवून दिलेल्या इतर शुल्काव्यतिरिक्त शिर्षाखाली वाजवी शुल्क आकारण्याची परवानगी असल्याचे नमुद केले आहे. परंतू महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि.०१ मार्च २०१७ रोजी पासून अंमलात आला. या अधिनियमातील कलम १०१ (७) प्रमाणे आय.एल.एस. विधी महाविद्यालयाने विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शिर्षव्यतिरिक्त इतर शिर्षाखाली शुल्क निश्चित करुन घेण्याचा प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पुर्वी विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक असताना सदर महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये विद्यापीठाची मान्यता न घेता याचिकाकर्ते श्री. मयुर गरुड यांचेकडन बेकायदेशीर व अपादर्शक पध्दतीने शुल्क वसूल केले आहे.

९.२. आय.एल.एस. विधी महाविद्यालयाने इतर शुल्काव्यतिरिक्त आकारावयाच्या शुल्क मंजूरीचा प्रस्ताव दि.२३.३.२०२३ रोजी विद्यापीठाकडे सादर केला व दि.०९.५.२०२३ रोजी यासंदर्भात स्मरणपत्र विद्यापीठास सादर केले. दि.०९.५.२०२३ रोजी विद्यापीठास सादर केलेल्या स्मरणपत्रास अनुसरुन विद्यापीठाने दि.०८.६.२०२३ रोजी निर्गमित केलेल्या पत्राचा चुकीचा अर्थ लावून याचिकाकर्ते श्री.मयुर गरुड यांचेकडन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुध्दा विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शिर्षाव्यतिरिक्त इतर शिर्षाखाली बेकायदेशीरपणे व अपादर्शक पध्दतीने शुल्क वसूल केले आहे.

९.३. आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे यांनी याचिकाकर्ते श्री. मयूर सुहास गरुड यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ मध्ये इतर शुल्क म्हणून जी रक्कम वसूल केली आहे त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०१(७) अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता घेतलेली दिसून येत नसल्याने वसूल केलेले शुल्क रु.१,०४,८६३/- हे बेकायदेशीरपणे व अपारदर्शक पध्दतीने वसूल केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर रक्कम याचिकाकर्ते विद्यार्थीस फी भरलेल्या पावतीच्या दिनांकापासून महाविद्यालय विद्यार्थीस परतफेड करेल त्या दिवसापर्यंत ६ टक्के दराने व्याजासह परत करणे उचित ठरेल. त्याचप्रमाणे या महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाकडूनही बेकायदेशीरपणे व अपारदर्शक पध्दतीने घेतलेले शुल्क महाविद्यालयाने परत करणे उचित ठरेल.

**१०. सदर प्रकरणी चौकशी समितीने सादर केलेला अहवाल, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, इंडियन लॉ सोसायटी, पुणे, श्री. मयुर सुहास गरुड यांनी सादर केलेली निवेदने आणि प्रकरणाची वस्तुस्थिती विचारात घेता, खालील बाबी स्पष्ट होतात:-**

१०.१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०१ (७) नमूद केले आहे की, सर्वसाधारणपणे विविध पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम यांकरिता शुल्क निश्चिती समितीने शिफारस केलेले आणि विद्यापरिषदेने अंतिमरीत्या मान्यता दिलेले शिकवणी शुल्क, इतर शुल्क आणि आकार लागू असतील. परंतु, ज्या महाविद्यालयाची आणि स्वायत्तत् परिसंस्थेची, विद्या परिषदेने विहित केले असेल आणि मान्यता दिली असेल अशा शुल्काव्यतिरिक्त वेगळे शुल्क (Other than Other Fee)

C.B.12 a 6.7 (चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

आकारण्याची इच्छा असेल, अशा कोणत्याही महाविद्यालयास आणि मान्यताप्राप्त परिसंस्थेस शुल्क निश्चिती समितीकडे तसा प्रस्ताव सादर करता येईल आणि शुल्क निश्चिती समिती, अशा अर्जदार महाविद्यालयाकडून किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेकडून पुरविण्यात येणाऱ्या निरनिराळ्या अतिरिक्त सुविधांच्या निर्धारणाच्या आणि मूल्यमापनाच्या आधारे अशा महाविद्यालयांतील किंवा परिसंस्थेतील विशिष्ट पाठ्यक्रमांचे किंवा अध्ययनक्रमांचे शिकवणी शुल्क, इतर शुल्क व आकार निश्चित करील. याबाबतचा शुल्क निश्चिती समितीचा निर्णय अंतिम असेल आणि तो अर्जदार महाविद्यालय आणि परिसंस्था यांच्यावर बंधनकारक असेल.

१०.२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि. ०१.०३.२०१७ पासून राज्यात लागु करण्यात आला असल्याने, संस्थेने इतर शुल्काबाबतचा प्रस्ताव शुल्क निश्चिती समितीसमोर सादर करणे आवश्यक असताना आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे यांनी प्रथम दि. २३.०३.२०२३ रोजी इतर शुल्काबाबतचा प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या कडे प्रथम प्रस्ताव सादर केला असल्याचे दिसुन येते. त्यामुळे श्री. मयुर गरुड यांच्याकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ आणि २०२१-२२ या कालावधीत आकारण्यात आलेल्या शुल्कास विद्यापीठाची मान्यता नव्हती, ही बाब स्पष्ट होते.

१०.३. कोविड-१९ मुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांच्या शुल्क निश्चितीबाबतच्या दि. २८.०२.२०२० च्या आदेशास दि. २७.०६.२०२० व दि. २५.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती दिलेली असल्याने, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये पूर्वीचे शुल्क दर रु. ३६,७९०/- लागु राहतील, असे संस्थेने नमुद केले आहे. परंतु, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि. ०१.०३.२०१७ पासून राज्यात लागु करण्यात आला असल्याने, संस्थेने इतर शुल्काबाबतचा प्रस्ताव शुल्क निश्चिती समितीसमोर दि. २८.०२.२०२० पर्यंतही सादर केलेला नाही.

१०.४. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दि. ०८.०६.२०२३ च्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये जुने शुल्क सुरु ठेवण्यास मान्यता दिली. तसेच, विद्यापीठाने संस्थेने सादर केलेल्या दि. २३.०३.२०२३ रोजीच्या प्रस्तावावर विहीत मुदतीत निर्णय न घेतल्याने प्रस्तावास मानीव मान्यता प्राप्त झाली आहे, असे संस्थेने नमूद केले आहे. परंतु, विद्यापीठाने जरी दि. ०८.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता जुने इतर शुल्क सुरु ठेवण्याबाबत कळविले असले, तरी जुने इतर शुल्क हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ (७) नुसार विहीत पध्दतीने मान्य करुन घेतलेले असणे अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या दि. ०८.०६.२०२३ रोजीच्या पत्राचा सोयीस्कर अर्थ घेऊन कायद्यानुसार विहीत मान्यतेची प्रक्रिया टाळल्याचे दिसुन येते. तसेच, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये इतर शुल्काच्या मानीव मान्यतेबाबतची कोणतीही तरतुद आढळून येत नाही.

१०.५. मा. न्यायालयाच्या दि. १२.०२.२०२६ रोजीच्या आदेशास अनुसरुन शासनाने गठित केलेल्या चौकशी समितीमध्ये व विद्यापीठाच्या कुलगुरुंनी ऑगस्ट २०२५ मध्ये स्थापन केलेल्या चार

C. B. Patil
(चंद्रकांत (दादा) पाटील)

सदस्यीय समितीमध्येही विद्यापीठाचे उपकुलसचिव असल्याने समिती पक्षपाती होती, असे संस्थेने नमूद केले आहे. परंतु, शासनास सादर केलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालाचे अवलोकन केले असता, समितीने चौकशी दरम्यान संस्थेला त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याचे दिसुन येते. तसेच, शासनास सादर केलेला अहवाल हा एक सदस्यीय समितीचा नसून त्रिसदस्यीय समितीचा आहे. त्यामुळे केवळ दोन समित्यांमध्ये एका समान सदस्याचा समावेश असल्याने समितीची कार्यवाही पक्षपाती होती हा आक्षेप चुकीचा आणि वस्तुस्थितीस धरुन नाही.

१०.६. शासन किंवा गठीत चौकशी समितीला महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ (७) व (८) अन्वये शुल्क परताव्याचा (रिट याचिका क्र. ११५४६/२०२५ मधील मागणी मुद्दा क्र. 'g' नुसार) आदेश देण्याचा अधिकार नाही, असे संस्थेने निवेदनात नमूद केले आहे. परंतु, महाविद्यालयाने वसूल केलेल्या शुल्काबाबत चौकशी करुन निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही (शासन पत्र दिनांक १३.४.२०२६) ही मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १२.२.२०२६ रोजीच्या आदेशानुसार करण्यात आलेली आहे.

१०.७. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०१ मधील तरतुदींनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शुल्क निश्चिती समितीने दि. १०.०७.२०२६ रोजी महाविद्यालयाचे इतर शुल्क (Other than Other Fee) निश्चित केलेले आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ करीता इतर शुल्क (Other than Other Fee) अनुक्रमे रु. २७१४ /-, ४०३१ /- व ३३४२ /- अशी निश्चित करुन दिलेली आहे. संस्थेने श्री. मयुर सुहास गरुड यांच्याकडुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ करिता अनुक्रमे रु. ३६,७९० /- , ३१,२८३ /- आणि ३६,७९० /- इतके इतर शुल्क आकारलेले आहे. विद्यापीठाच्या शुल्क निर्धारण समितीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ करीता निश्चित केलेले इतर शुल्क विचारात घेता, महाविद्यालयाने श्री. मयुर सुहास गरुड यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ मध्ये आकारण्यात आलेले इतर शुल्क व विद्यापीठाने दि. १०.०७.२०२६ रोजी ठरवून दिलेले इतर शुल्क यामध्ये मोठी तफावत असल्याचे दिसुन येते.

१०.८. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दि. २३.१२.२००९ रोजीच्या आदेशान्वये व्यवसायीक महाविद्यालयांचे बाबनिहाय इतर शुल्क निश्चित करण्यात आले होते. तसेच, सदर परिपत्रकातील सर्वसाधारण सुचना (General Conditions) क्र. ४ नुसार विद्यापीठाने ठरवून दिलेल्या इतर शुल्काव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या अतिरिक्त सेवांच्या अनुषंगाने अन्य शुल्क वाजवी प्रमाणात आकारण्यास महाविद्यालयास अनुमती दिलेली आहे. परंतु, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील १०१ (७) नुसार, अशा प्रकारचे विद्यापीठाने ठरवून दिलेल्या इतर शुल्कांव्यतिरिक्तचे अन्य इतर शुल्क (Other than Other Fee) निश्चित करण्याचे अधिकार हे

C.B.Patil
(चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री

महाविद्यालयास नसून विद्यापीठाच्या शुल्क निश्चिती समितीने शिफारस केल्यानुसार विद्यापरिषदेस आहेत.

१०.९. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि. ०१.०३.२०१७ पासून राज्यात लागु करण्यात आला असल्याने, आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे यांनी श्री. मयुर सुहास गरुड यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ मध्ये इतर शुल्क म्हणून जी रक्कम आकारलेली आहे, त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०१ (७) अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक होते. परंतु अशा प्रकारची कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

## आदेश

आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे यांनी श्री. मयुर सुहास गरुड यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२४-२५ मध्ये इतर शुल्क (Other than Other Fee) म्हणून जी रक्कम आकारलेली आहे, त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०१ (७) अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पूर्वमान्यता घेतलेली दिसून येत नसल्याने श्री. मयुर सुहास गरुड यांस कडुन आकारण्यात आलेले एकूण अतिरिक्त शुल्क रु. १,०४,८६३/- (अक्षरी रुपये एक लाख चार हजार आठशे त्रेसष्ट मात्र) हे अतिरिक्त आकारले असल्याचे दिसुन येते. यास्तव, सदर रक्कम श्री. मयुर सुहास गरुड यांस फी भरलेल्या पावतीच्या दिनांकापासून महाविद्यालय त्यांस परतफेड करेल त्या दिवसापर्यंत ६ टक्के दराने व्याजासह परत करावी.

C. B. Patil

**(चंद्रकांत दादा पाटील)**
**मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण**

(चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**ठिकाण** :- मंत्रालय, मुंबई.
**दिनांक** :- २ सप्टेंबर २०२६

**प्रति,**

१) प्राचार्य, आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे,
२) सचिव, इंडियन लॉ सोसायटी, पुणे
३) संचालक, उच्च शिक्षण, पुणे, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे,
५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
६) श्री. मयुर सुहास गरुड